पुढारी

# विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचा लौकिक उंचावला : कुलगुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत यंदा प्रथमच राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्राप्त करून संघातील विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाचा लौकिक उंचावला, असे गौरवोद्‌गार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी येथे काढले. राष्ट्रीय पुरस्कार वितरण समारंभात प्रदान करण्यात आलेल्या ट्रॉफीसह संघाने कुलगुरू डॉ. शिंदे यांची भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते.




**नवी दिल्ली : येथे ना. अर्जुन मेघवाल यांच्या हस्ते ट्रॉफी स्वीकारताना समन्वयक डॉ. प्रल्हाद माने आदींसह संघ.**

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी संघाचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने आदींसह सहभागी विद्यार्थ्यांचे स्पर्धेतील एकूण चमकदार कामगिरीबद्दल कौतुक केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

१४ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत यंदा शिवाजी विद्यापीठाच्या संघाने दमदार कामगिरीच्या जोरावर प्रथमच राष्ट्रीय स्पर्धेपर्यंत झेप घेतली. या संघाला विभागीय स्तरावर अव्वल दर्जाची कामगिरी बजावल्याबद्दल आणि या संघातील उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या आठ विद्यार्थ्यांना 'बेस्ट परफॉर्मन्स प्राईझ विनर' पुरस्कार जाहीर झाला. या १४ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ नवी दिल्ली येथील भारतीय संसद भवनाच्या बालयोगी सभागृहात पार पडला. संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या हस्ते पारितोषिक वितरण समारंभ झाला. संघातील निकिता पिसे, अभिजित ताम्हणकर, शैलेश चिले, श्रेयश मोहिते, विनायक साळुंखे, गौरी काटे, हेरंब सावंत व आकांक्षा पाटील या आठ विद्यार्थ्यांना बेस्ट परफॉर्मन्स पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

# कुलगुरूंकडून संघाचे अभिनंदन

कोल्हापूर : राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत यंदा प्रथमच राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्राप्त करून संघातील विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाचा लौकिक उंचावला, असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले. राष्ट्रीय पुरस्कार वितरण समारंभात प्रदान करण्यात आलेल्या ट्रॉफीसह संघाने कुलगुरू डॉ. शिंदे यांची भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी संघाचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांच्यासह सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे स्पर्धेतील कामगिरीबद्दल कौतुक व अभिनंदन केले. प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के उपस्थित होते.

संघातील निकिता पिसे, अभिजीत ताम्हणकर, शैलेश चिले, श्रेयश मोहिते, विनायक साळुंखे, गौरी काटे, हेरंब सावंत व आकांक्षा पाटील या आठ विद्यार्थ्यांना बेस्ट परफॉर्मन्स पुरस्कार प्रदान करून दिल्लीत गौरविण्यात आले.

# चौगुले महाविद्यालयात १९ ऑक्टोबरला चर्चासत्र

**कोतोली :** माळवाडी कोतोली, ता. पन्हाळा येथील श्रीपतराव चौगुले महाविद्यालयात शुक्रवार दि. १९ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्रात संशोधक विद्यार्थी व प्राध्यापक यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव शिवाजी पाटील व प्राचार्य डॉ. पी. ए. अत्तार यांनी केले आहे. चर्चासत्राचे उद्घाटन मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते होणार आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री विनोद तावडे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी डॉ. के एस. चौगुले आहेत. आ. शंभूराज देसाई, प्रा. डॉ. प्रकाश पवार. प्रा. डॉ. वासंती रासम. प्रा. डॉ. भारती पाटील संजय पाटील, प्रा. डॉ. रवींद्र भणगे, प्रा. डॉ. एस. ए. जमादार मार्गदर्शन करणार आहेत.

लोकमत

# विद्यापीठात विविध मंडळांच्या होतात नियमित बैठका...

शिवाजी विद्यापीठातील अधिकार मंडळे आणि अभ्यास मंडळांची एकूण संख्या ५४ इतकी आहे. या मंडळांच्या विद्यापीठाच्या नियमानुसार नियमितपणे बैठका होतात. अधिसभा (सिनेट), व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद आणि विद्याशाखा अशी एकूण १७ अधिकार मंडळे आहेत. विविध अशी ३७ अभ्यास मंडळे आहेत. त्यामध्ये विद्यापीठ विभाग व आंतर विद्याशाखा, महाविद्यालयांतील पदव्युत्तर शिक्षण मंडळ, आजीवन अध्यासन व विस्तार मंडळ, परीक्षा व मूल्यमापन, माहिती व तंत्रज्ञान, तक्रार निवारण समिती, बांधकाम, खरेदी, संशोधन, क्रीडा व शारीरिक शिक्षण, विद्यार्थी विकास, नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय सहचर्य मंडळ आणि वित्त व लेखा समितीचा समावेश आहे. अधिसभेच्या वर्षातून कमीत कमी दोन, व्यवस्थापन परिषदेची दरमहा, तर विद्या परिषदेच्या वर्षातून तीन बैठका होतात. अभ्यास मंडळांच्या वर्षातून दोनवेळा बैठका घेण्यात येतात. विद्यापीठातील अधिकार आणि अभ्यास मंडळांमध्ये सुमारे ५०० सदस्यांचा समावेश असल्याचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

संतोष मिठारी



# युवा महोत्सव शनिवारी महावीर कॉलेजमध्ये

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ३८ व्या युवा महोत्सवास ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून सुरूवात होत आहे. या अंतर्गत जिल्हास्तरीय महोत्सवास कोल्हापुरातील महावीर कॉलेज येथे शनिवार दि. २९ रोजी प्रारंभ होणार आहे.

महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळावा यासाठी शिवाजी विद्यापीठाच्यावतीने दरवर्षी मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. याअंतर्गत कोल्हापूर सांगली व सातारा या ठिकाणी जिल्हा पातळीवर महोत्सव घेण्यात येतात. सांगली येथील महोत्सव ५ ते ७ ऑक्टोबर या कालावधीत बाबासाहेब देशमुख कॉलेजमध्ये होणार आहे.

सातारा येथील महोत्सव एक ऑक्टोबर रोजी कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालय येथे होणार आहे. एकांकिका, लोकनृत्य, पथनाट्य, प्रश्नमंजुषा, लघुनाट्य, शास्त्रीय नृत्य, छायाचित्रण , मातीकाम, रांगोळी, मूकनाट्य, गायन, नकला, एकपात्री, सूरवाद्य, तालवाद्य या स्पर्धा मध्यवर्ती महोत्सवात होणार आहेत. पहिल्या टप्प्यात जिल्हास्तरीय महोत्सव होणार असून त्यातील पहिल्या तीन क्रमांकाचे विजेते मध्यवर्ती महोत्सवात सहभागी होणार आहेत.

### पथनाट्य होणारच

राज्य व राष्ट्रीय पातळीवरील महोत्सवात पथनाट्याचा समावेश नाही. यान्वये शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती महोत्सवातही पथनाट्याचा समावेश करू नये असा प्रस्ताव युवा महोत्सव कार्यक्रम समितीने व्यवस्थापन परिषदेला चार महिन्यांपूर्वी दिला होता. मात्र कलाकारांनी या प्रस्तावाविरोधात नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे महोत्सवात पथनाट्य कायम राहणार आहे.

सकाळ

# ‘किर्लोस्कर वसुंधरा’चे डॉ. अनिल अवचट उद्‌घाटक

## १ ऑक्टोबरपासून प्रारंभ; ‘सकाळ’चे बी. डी. चेचर यांना वसुंधरा मित्र पुरस्कार

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : येथे १ ऑक्टोबरपासून रंगणाऱ्या नवव्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व साहित्यिक डॉ. अनिल अवचट यांच्या हस्ते होणार आहे. ‘प्रदूषण टाळा-नदी वाचवा’ या संकल्पनेवर यंदा हा महोत्सव होणार असून, पंचगंगा प्रदूषणाचे विदारक वास्तव डॉ. अनिल अवचट यांनी आपल्या लेखणीतून मांडल्याने पंचगंगा प्रदूषणमुक्तीच्या लढ्याला बळ मिळाले. त्यामुळे त्यांच्या



प्रा. डॉ. अवचट



राजेंद्र मदने

हस्ते महोत्सवाचे उद्‌घाटन होणार असल्याची माहिती आज ‘किर्लोस्कर’चे कृष्णा गावडे, उदय गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यंदाच्या महोत्सवात सांगलीतील अग्रणी नदीच्या पुनरुज्जीवनासाठी झटणारे राजेंद्र मदने यांचा वसुंधरा सन्मान पुरस्काराने गौरव होणार आहे. पंचगंगा प्रदूषणमुक्तीसाठी सक्रिय



प्रा. डॉ. राऊत

योगदान दिलेले प्रा. डॉ. पी. डी. राऊत, प्रा. डॉ. एस. डी. कदम, प्रा. डॉ. अनिल कुलकर्णी यांचा वसुंधरा गौरव पुरस्काराने; तर ‘सकाळ’चे छायाचित्रकार बी. डी. चेचर, फ्रेंड्स नेचर क्लबचे तुषार साळगावकर, मलबार नेचर कन्झर्व्हेशन क्लब (आंबोली) यांचा वसुंधरा मित्र पुरस्काराने गौरव होणार आहे. देशातील सहा राज्यांतील ३६ ठिकाणी हा महोत्सव होतो. येथे सलग नवव्या वर्षी हा महोत्सव होत असून लघुपट, चित्रपट, सांस्कृतिक कार्यक्रमांसह ‘वस्त्रोद्योग व नदी



बी. डी. चेचर



प्रा. डॉ. कदम

प्रदूषण’, ‘नदी प्रदूषण रोखण्यासाठी तंत्रज्ञान’ या विषयावर परिसंवाद, युवकांसाठी ‘नदीप्रदूषणाची कारणे आणि उपाय’ या विषयावर युवा संसद, ‘प्रदूषण रोखा-नदी वाचवा’ या विषयावर पोस्टर स्पर्धा, ‘रिव्हर अँड फन’, हेरिटेज वॉक, अभ्यास सहलींसह व्याख्यानांचा समावेश असेल.

पत्रकार परिषदेला प्राचार्य अजय



साळगावकर



प्रा.डॉ.कुलकर्णी

दळवी, राहुल पवार, अनिल चौगुले, विजय टिपुगडे, भाऊ सूर्यवंशी, ॲड. केदार मुनीश्वर, ऐश्वर्या मुनीश्वर आदी उपस्थित होते. दरम्यान, महोत्सवासाठी उद्या (ता. २७) पासून सकाळी अकरा ते सात या वेळेत शाहू स्मारक भवनात व निसर्गमित्र (साईक्स एक्स्टेन्शन) येथे दुपारी तीन ते सायंकाळी सात या वेळेत नावनोंदणी सुरू होणार आहे.

### दृष्टिक्षेपात महोत्सव

- **१ ऑक्टोबरला सायंकाळी पाच वाजता शाहू स्मारक भवनात उद्‌घाटन सोहळा.**
- **४ ऑक्टोबरपर्यंत महोत्सवांतर्गत विविध उपक्रम, १५ देशांतील ४० लघुपट व अनुबोधपट.**
- **२ ऑक्टोबरला सायंकाळी पाचला वसुंधरा गौरव व वसुंधरा मित्र पुरस्कारांचे वितरण.**
- **४ ऑक्टोबरला सायंकाळी पाचला वसुंधरा सन्मान पुरस्कार वितरण व सांगता सोहळा.**